# अग्नीशमन प्रशिक्षण

## अनुक्रमणिका

**( काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे ( मुद्दे ) '*' या चिन्हाने दर्शवली आहेत. )**


- मनोगत ६
- ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य ८

१. प्रास्ताविक / पूर्वविवेचन ९

२. आगीचे शास्त्र १०

  २ अ. आगीतून मिळणाऱ्या उष्णतेचा उगम १०

  २ आ. आगीसंबंधित व्याख्या ११

  २ इ. आगीचे घटक   २ ई. आगीचे टप्पे १२

  २ उ. आग लागण्याची सामान्य कारणे १४

  २ ऊ. आग पसरण्याची कारणे   २ ए. आगीचे वर्गीकरण १५

३. अग्नीशमन १८

  ३ अ. आग बघितल्यावर आपण काय कराल ? १८

  ३ आ. आग शोधून काढणारी उपकरणे आणि त्यांचा वापर १९

  ३ इ. अग्नीशमनाच्या पद्धती   ३ ई. अग्नीशमनाची माध्यमे २१

४. अग्नीशमन उपकरणे २५

  ४ अ. कायमस्वरूपी अग्नीशामक (फिक्स्ड एक्सटिंग्विशर) २५

  ४ आ. सुवाह्य (वाहून नेण्याजोगा) अग्नीशामक (पोर्टेबल एक्सटिंग्विश) २५

५. अग्नीशमन दल ४०

  ५ अ. अग्नीशमन दलाच्या जवानाची (फायरमनची) कर्तव्ये ४१

६. प्रसंग आणि प्रासंगिक उपाययोजना ४१

  ६ अ. प्रतिकूल प्रसंगात एकट्याने अग्नीशमनाचा प्रयत्न करू नये ४२

  ६ आ. जळणाऱ्या घरातून / वास्तूतून स्वतःची सुटका ४२

  ६ इ. आगीने घेरले गेल्यास काय करावे ? ४३

६ ई. उंच इमारतीला आग लागल्यास ४४
६ उ. स्वतःलाच आग लागल्यास ४४
६ ऊ. साथीदाराला आग लागल्यास ४४
६ ए. घरगुती वापरातील वायूची गळती झाल्यास ४५
६ ऐ. स्टोव्हचा भडका उडाल्यास किंवा कढईतील तेलाला आग लागल्यास ४५
६ ओ. अग्नीशमनासाठी चुकीचे माध्यम वापरल्यामुळे घडणारे अपघात ४६
७. अग्नीप्रतिबंधक उपाययोजना ४८
७ अ. कार्बनयुक्त घनरूप इंधन ४८
७ आ. द्रवरूप / वायूरूप इंधन ४८
७ इ. धातूरूप इंधन ४९
७ ई. वीज आणि विजेच्या उपकरणांमुळे लागू शकणारी आग ४९
७ उ. स्वयंपाकघरातील आग ५०
७ ऊ. फटाके ५३
७ ए. आग आणि मुले ५४
७ ऐ. रसायने हाताळतांना घ्यावयाची काळजी ५५
७ ओ. द्रवरूप वायूचे सिलिंडर हाताळतांना घ्यावयाची काळजी ५६
७ औ. उंच इमारतींमध्ये रहाणाऱ्यांसाठी ५६
७ अं. वाहतूक सुरक्षा ५७
७ क. सर्वसाधारण सूचना ५८
७ ख. औद्योगिक सुरक्षितता ५९
७ ग. आपत्कालीन कृती आराखडा ६१
८. भाजल्यामुळे होणाऱ्या जखमा आणि प्रथमोपचार ६२
९. आगीच्या काही प्रसिद्ध घटनांचा पृथक्करणात्मक अभ्यास ६६
१०. आध्यात्मिक शक्तीने अग्नीप्रकोप रोखणे ७०
११. सनातन संस्थेचे कार्य ७३

# मनोगत

'एका छोट्याशा ठिणगीपासून उद्भवलेल्या आगीचा शेवट हा छोटाच असतो असे नाही', या आशयाची एक इंग्रजी म्हण आहे. केवळ या म्हणीवरून आगीची दाहकता, संहारकता किंवा तिचे भीषण परिणाम यांतील गांभीर्य लक्षात येत नाही; तर आगीचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेल्यांनाच त्याची कल्पना असते. 'आग' ही दैनंदिन जीवन-व्यापारातील एक अत्यावश्यक घटक असली, तरी तिच्या संदर्भात नियंत्रित आणि अनियंत्रित यांमधील लक्ष्मणरेषा फार महत्त्वाची असते. सर्वसाधारणतः मनुष्य उपयोगात आणत असलेल्या सर्व आगी नियंत्रित असतात; पण एखाद्या प्रसंगी आग नियंत्रणाची लक्ष्मणरेषा ओलांडू शकते. असे झाल्यास त्यावर काय उपाययोजना करायची, याचे ज्ञान ती आग हाताळणाऱ्यांना असणे महत्त्वाचे असते. अग्नीशमनाविषयीचे प्रशिक्षण मोठमोठे कारखाने, प्रवासी नौका (जहाजे), विमाने आदींमध्ये दिले जाते; परंतु खेदाची गोष्ट म्हणजे सर्वसामान्य मनुष्य, तसेच दिवसातील ५-६ घंटे आगीवर स्वयंपाक करणारी गृहिणी आगीचे शास्त्र आणि अग्नीशमनाचे उपाय या संदर्भात पूर्णतः अनभिज्ञ असते. या अज्ञानातून कित्येक अपघात घडतात. आगीचे शास्त्र, अग्नीशमनाची विविध माध्यमे आणि त्यांचा उपयोग करण्याच्या पद्धती, चुकीची माध्यमे वापरल्याने होणारे दुष्परिणाम इत्यादींविषयी शास्त्रीयदृष्ट्या आणि सोप्या भाषेत ज्ञान देणे, हा ग्रंथ संकलित करण्याचा मुख्य उद्देश आहे.

हिंदु धर्मात देवऋण, पितृऋण, ऋषीऋण आणि समाजऋण, ही चार ऋणे प्रत्येक मनुष्याने फेडणे हे त्याचे विहित कर्तव्य मानले आहे. यांपैकी परस्पर सहकार्य आणि परोपकार यांनी समाजऋण फेडता येते. अग्नीशमन प्रशिक्षणाचे ज्ञान आत्मसात करून वेळप्रसंगी त्याचा समाजासाठी उपयोग करणे, हा समाजऋण फेडण्याचाच एक भाग आहे.

अग्नीप्रलयाच्या आपत्तीमुळे राष्ट्राची जीवित आणि वित्त अशी दोन्ही प्रकारे मोठ्या प्रमाणावर हानी होत असते. ही हानी रोखण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील होणे म्हणजे राष्ट्रहित आणि राष्ट्ररक्षण यांच्या कार्यात सहभागी होणे. राष्ट्राच्या आयुष्यातच समष्टीचे जीवन अंतर्भूत असते; कारण राष्ट्र जगले, तरच समाज जगेल आणि समाज जगला, तरच व्यक्ती जगेल. व्हाक्ती जगली, तरच साधना करू शकते. म्हणूनच स्वहित आणि राष्ट्ररक्षण यांसाठी 'अग्नीशमन प्रशिक्षण' या विषयाचे महत्त्व प्रत्येकाने समजून घेणे आवश्यक आहे.

या ग्रंथातील ज्ञान वाचून अग्नीप्रकोपाच्या आपत्तीपासून स्वतःचे, तसेच साधना म्हणून समाज आणि राष्ट्र यांचे रक्षण करण्याची क्षमता प्रत्येकामध्ये निर्माण होवो, ही श्रीगुरुचरणी प्रार्थना.

**– संकलक.**